7/2016


BR 2015-16

ISSN: 2229-4856

Abhisaran

VOL. XV SPECIAL ISSUE APRIL 2016

# RELEVANCE OF GANDHIAN THOUGHTS



PART IV

Editors

Dr. Vasant Sanap

Mr. Shailesh Akulwar

330

60

Scanned by TapScanner

निर्माण करणे करण्यासाठी प्रयत्न करणे. महात्मा गांधीचे जीवनकार्य व्यक्ती, राष्ट्र व समाज या सान्यांनी व्यापले होते जे चांगले जे चिरंतन जे सत्य तेच ईश्वराचे रुप. सत्याची आराधना म्हणजे ईश्वराची आराधना ईश्वरविषयक या व्यापक संकल्पनेमुळे अमूकच ईश्वर खरा हा विचारच हास्यास्पद आहे.

**सत्य-अहिंसा :** संपूर्ण विश्व हे ईश्वराचे रुप आहे. त्यामुळे द्वेश, तिरस्कार, भेदाभेद यांस थाराच उरत नाही. महात्मा गांधी म्हणतात, "जेव्हा माझ्यासह संपूर्ण विश्व एकाच सर्वव्यापी ईश्वराचे रुप आहे तेव्हा एखाद्यास दुष्ट किंवा आपला शत्रू मानून त्याचा तिरस्कार मी कसा करु? मी एखाद्याबद्दल भीती तरी कशी बाळगू किंवा एखाद्यास भेडसावू तरी कसा? एखाद्यास मी दुसऱ्या कोणापेक्षा अधिक जवळचा तरी कसा मानू?"[४]

वरील विवेवचानामधून सत्य-अहिंसा यातील अन्योन्य संबंधही स्पष्ट होतो. आपल्यासह संपूर्ण विश्व एकाच ईश्वराचे मूर्तरुप आहे.हे सत्य या सत्याविषयीच्या ज्ञानाचा जो आचरणात्मक अविष्कार होतो ती अहिंसा स्वार्थीपणाने, द्वेषाने, किंवा मत्सरातून केलेली कृती म्हणजे हिंसा होय आणि चांगुलपणाच्या भावनेतून केलेली कृती म्हणजे अहिंसा होय.

म.गांधींनी प्रतिपादन केलेले खरे धर्माचे रुप हे आधात्मिक ऐक्य व समजूतदारपणा यावर आधारीत आहे. सर्व धर्म म्हणजे एकाच सत्यापर्यंत जाण्याचे विविध मार्ग होय. त्यांचे अंतिम ध्येय एकच त्यामुळे प्रत्येकानेच प्रत्येक धर्माविषयी मनामध्ये पूज्यभाव व आदरभाव बाळगावा हेच महात्मा गांधींच्या सहिष्णुतावादी विचारांचा मतितार्थ आहे. त्याचे सारांश रुप पुढीलप्रमाणे आहे.

**सारांश :**

१) देशामधील अन्याय-अत्याचार-दारिद्र्य दूर करणे हे राष्ट्रीय कार्यच नव्हे तर ते प्रत्येकाचे धार्मिक कर्तव्य आहे.

२) ईश्वर एकच आहे. सर्वच धर्माच्या साधुसंतांची जीवनविषयक सारखी दृष्टी हा ईश्वर एकच असल्याचा पुरावा आहे.

**संदर्भ :**

१) डॉ.शिवाजीराव भोसले-दीपस्तंभ, पृष्ठ १९७

२) डॉ.तांदळे, प्रा.विराजदार, डॉ.आघाव- भारतीय विचारवंत पृ.१३२ चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

३) डॉ.शिंदे ज.रा., डॉ.परळीकर रेखा - भारतीय राजकीय विचारवंत, तिरुपती प्रकाशन,औरंगाबाद. पृष्ठ १३३

४) तत्रैव- पृष्ठ, १३५

□□□

4.

## गांधीजींच्या सामाजिक, आर्थिक विचारांची यथार्थता

प्रा. मेघराज रा. शिंदे

कला व विज्ञान महिला महा. मेहकर.

भारत हा कृषिप्रधान देश आहे. तसेच तो खेड्याचा देश आहे. भारतातील ७४% लोक खेड्यात राहतात. त्यांचा उदरनिर्वाहाचा व्यवसाय शेती आहे. १९४७ च्या फाळणीपुर्वी भारतात ७ लाख खेडी होती. १९५१ च्या जनगणना अहवालानुसार भारतामध्ये ५,५८,०८९ खेडी आहेत. सध्या भारतात ५.५ लाख खेडी आहेत. भारतात एकुण लोकसंख्येपैकी ८२.७० टक्के लोक खेड्यात राहत होते यामुळेच म.गांधी म्हणतात की, भारतातील खेडी जर नष्ट झाली तर भारत नष्ट होईल.

If village Perishes India will Perish too. It will be no more india, her own mission in the world will get lost.

**म. गांधीजींचे सामाजिक, आर्थिक विचार :-**

**गांधीवादी अर्थव्यवस्था :-** गांधीच्या मते आर्थिक उन्नती हे साध्य नसुन साधन आहे. आणि आर्थिक साधनाच्या द्वारे मानवाची आध्यात्मिक उन्नती साध्य करावयाची आहे. त्यामुळे ज्या अर्थ रचनेत व्यक्तीच्या आध्यात्मिक विकासाला बाधा येते ती अर्थरचना गांधीजींनी मान्य नाही. आजच्या अनेक समस्याचे मुळ विलासी उपभोग प्रवृत्ती व भपकेबाज राहणी यात आहे परंतु साधी राहणी उच्च विचारसरणी हे गांधीवादाचे मूलतत्व आहे. व्यक्ती व समाज या दोहोचा समन्वय साधून आर्थिक उद्दिष्टे साधली पाहिजेत. या दृष्टिने गांधीजींची अर्थरचनेची प्रमुख वैशिष्ट्ये पुढिलप्रमाणे सांगता येतील.

**यंत्राचा मर्यादित उपयोग :-** यांत्रिकीकरणाचे दुष्परिणाम टाळण्यासाठी यंत्राचा उपयोग मर्यादित असावा असे गांधीजींनी सांगितले. कारागीर शक्यतो आपल्या यंत्राचा मालक असावा. तसेच यंत्रामुळे त्याच्या कलात्मक प्रवृत्तीचा व कौशल्याचा विकास होण्यास अडथळा येणार नाही याची दक्षता घ्यावी. भांडवलवादी किंवा समाजवादी अर्थरचनेत अभिप्रेत असलेली अवजड यंत्रे, सूक्ष्म श्रमविभागणी, कारखाणे व विशाल शहरे गांधीना मान्य नाही. कारण अवजड यंत्रामुळे व्यक्तीचा नैतिक, अध्यात्मिक व सांस्कृतिक विकास खुंटतो. सर्वसामान्य मजुर अशा प्रकारच्या किंमती यंत्रचा मालक राहु शकत नाही. त्यामुळे तो केवळ कामगार बनतो. उत्पादनात त्याला त्यामुळे गोडी वाटत नाही. म्हणुन लहान लहान यंत्राच्या साहायाने उत्पादन करण्यात यावे. असे गांधीजींचे मत आहे. तसेच यंत्रशक्तीच्या वापराने मनुष्य शक्तीला वाव राहत नाही. व बेकारी वाढते व बेकारीमुळे अनेक आर्थिक, राजकीय व सामाजिक प्रश्न उपस्थित

होतात. म्हणून यंत्राचा मर्यादीत वापर करून मनुष्य शक्तीला जास्तीत जास्त काम देण्यास यावे.

**विकेन्द्रीत उत्पादन :-** यांत्रिकीकरणामुळे उत्पादनाचे कारखान्यात केन्द्रीकरण झालेले दिसते. त्यामुळे आर्थिक सत्तेचे देखील केन्द्रीकरण होते. व वर्गकलह निर्माण होतात. म्हणुन गांधीवादानूसार वस्तूचे उत्पादन निरनिराळ्या विभागात विभागलेले असावे. तसेच उत्पादनाची मालकी मोजक्या कारखानदाराच्या हातीं न राहता अनेक लहाननोठ्या कारखानदारात विभागली जाईल. त्यामूळे सत्तेचेही विकेन्द्रीकरण होईल व व्यक्तीचा विकास साधला जाईल.

**ग्रामप्रधान अर्थव्यवस्था :-** गांधीवादी अर्थव्यवस्थेत स्वयंपुर्ण व समृध्द ग्राम किंवा खेडे अत्यंत मूलभूत घटक आहे. उत्पादनाच्या विकेन्द्रीकरणाद्वारे प्रत्येक गाव आपल्या जीवनविषयक व सांस्कृतिक गरजा पूर्ण करू शकेल. ह्या दृष्टिने शेती व शेतीपुरक असे लघुउद्योग, कुटिरोद्योग, बारा बलुतेद्वारा चालणाऱ्या हस्तोद्योगाला चालना मिळुन प्रत्येकाला रोजगार व उदरनिर्वाहाचे साधन मिळु शकते. गांधीजींच्या स्वयंपूर्ण खेड्याच्या संकल्पनेत परस्परांच्या सहकार्याची भावना, आपलेपणा, जिव्हाळा निर्माण होतो.

**साधनसुचिता :-** प्रचलित अर्थव्यवस्थेत अहिंसात्मकतेवर गांधीजींचा भर होता. संत्य, अहिंसा यांच्या आधाराने मतपरिवर्तन असहकार व आत्मक्लेश या मार्गांनी बदल घडवून आणले पाहिजेत. कोणावर कोणत्याही प्रकारची जबरदस्ती करू नये असे गांधीजींचे म्हणणे होते. माणसातील चांगूलपणावर गांधीजींचा विश्वास होता. मुळात कोणीही वाईट नसते. माणसाच्या हातून ज्या चूका होतात त्या अज्ञानामुळे होतात. म्हणून प्रत्येकाला सुधारण्याची संधी मिळाली पाहीजे. प्रेम, करूणा या मार्गाने हृदय परिवर्तन होऊ शकते. यावर गांधीजींचा विश्वास होता. समाजात सहकार्याने, प्रेम भावनेने परस्पर हिताच्या दृष्टीकोनातुन व्यवहार चालावे असे त्यांना अभिप्रेत होते.

**सर्वोदय :-** संकुचित भावनेचा त्याग करून सर्वांचा विचार करणे. म्हणजे सर्वोदय होय. या विचारानुसार समाजात बुध्दि आणि श्रम समाजाला सारखे उपयुक्त ठरतात. श्रमानुसार वेतन मिळणार त्यासाठी श्रम आवश्यक आहे.

**श्रमाची प्रतिष्ठा :-** श्रम म्हटले तर कोणतेही असो त्याला समाजात प्रतिष्ठा मिळाली पाहिजे त्यासाठी त्यांनी आग्रह धरलेला होता त्यांची सर्वकामांला सारखी प्रतिष्ठा मिळाली पाहिजे या वाक्यावरून दिसून येते.

**विश्वस्त कल्पना :-** स्वत: विश्वस्त आहोत ही भावना प्रबळ झाली की तो त्या संपत्तीचा मालक राहत नाही. विशेषत: भांडवलदार वर्गाने खाजगी मालमत्तेचा त्याग करावा आणि एक विश्वस्त म्हणून त्याकडे लक्ष पुरवावे. त्यामुळे त्या संपत्तीचा लाभ समाजातील दीन- दुबळ्यांना झाल्यशिवाय राहणार नाही.

**स्त्रियांची प्रगती :-** स्त्रिने शिक्षित होणे गरजेचे आहे. आजपर्यंत जे परावलंबित्वाचे जे जिवन ती जगत होती. ते तीला जगावे लागणार नाही. आपल्या मुलांना जगावयास भाग पाडणार नाही. शिक्षणामुळे योग्य अयोग्यातेची जान आल्यामुळे ती आपल्या मुलांना योग्य रीतीने घडवु शकेल. आर्थिक दृष्टया ती सबळ होईल. त्यसाठी गांधीजींनी स्त्रिशिक्षणाकडे जास्त लक्ष पुरविले आहे.

**मद्य सेवनास विरोध :-** समाजाची अधोगती मद्य सेवनामुळे होते. समाजाची अधोगती म्हणजे राष्ट्राची अधोगती . गांधी मद्यपानाचे कट्टर विरोधक होते. दारूचे घातक परिणाम असल्यामुळे दारूबंदिसाठी समाजाला परावृत्त करणे गरजेचे आहे-असे गांधी म्हणत.

**अस्पृश्यताभेद करणे :-** पुर्वीपासुन समाजात वर्णव्यवस्थेनुसार कारभार चालत आलेला होता. तेच वर्ण आज जाती-जातीत विभागले गेले आहेत. वर्णाच्या जाती झाल्या. जातींची किड इतकी खोलवर गेली की, ती मानसाच्या सावलीपर्यंत जी मानसाला मानुस म्हणुन समजत नसेल अशा जातींना मान्यताच द्यायला नको. सर्व समाजाची एकच जात व्हावी ही भावना प्रत्येकाच्या मनात रूजायला हवी तरच समाजाचा विकास होईल.

**हिंदू-मुस्लिम ऐक्य :-** म.गांधीनी सर्वधर्म समभावाची कल्पना मांडलेली आहे. सर्वांनी ह्या विचाराची कास धरली तर ही धार्मीक बंधने शिथिल होतील, आणि एकीची भावना दृढ होईल. जे बहुसंख्य आहे त्यांनी अल्पसंख्यकाचे संरक्षण करणे गरजेचे आहे. तसेच अल्पसंख्यकांनी देखिल बहुसंख्यकावर पुर्ण विश्वास टाकला पाहिजे. परस्पर सामंजस्याची भावना मनामनात रूजली की हे वाद नष्ट होतील आणि समाजात शांतता प्रस्तापित होईल. त्यामुळे समाज आपली प्रगती करू शकेल. भारताच्या विकासासाठी गांधीजींनी आर्थिक, सामाजिक सुधारणेबरोबरच राजकीय, शैक्षणिक सुधारणेला महत्व दिले असले तरी सुध्दा समाज स्थिती चांगली असेल तर इतर स्थितीत सुधारणा होवु शकतात. समाजाचा विकास झाला तर आर्थिक विकास होईल. आर्थिक विकास तेव्हाच होईल जेव्हा समाज शिक्षित असेल. शिक्षित समाजातील शिक्षित नेतेच राज्यांचा कारभार निट चालवतील पर्यायाने सर्व दृष्टिने समाजाच्या विकासाबरोबर राष्ट्राचा विकास होईल यात शंका राहणार नाही.


**संदर्भ:-**

१) म. गांधी - हिंद स्वराज, नवजीवन प्रकाशन, अहमदाबाद २०२० पृ. क्र. ६५.
२) डॉ. प्र.न.देशपांडे - आधुनिक भारताचा इतिहास विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद
३) गंगा प्रसाद शर्मा -इतिहास पुरुष, मनोज पब्लिशर्स, दिल्ली २००६ पृ. क्र. १४.
४) दै. देशोन्नती ३० डिसेंबर २०१५


Co - Ordinator IQAC
Arts & Science Mahila Mahavidyalaya
Ab[illegible]